# मिरा भाईंदर महानगरपालिका

## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-401101.

दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in

मुख्य कार्यालय


जा.क्र. : मिभा/मनपा/वैद्यकीय/२९२/२०२१-२०२२ दिनांक : २८/०४/२०२१

## आदेश

**अत्यंत महत्वाचे/ तातडीचे**

**विषय:-** **कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करणेसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेले निर्बंध लागू करणेबाबत.**

**संदर्भ :-** **१) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२०**
**२) मिभा/मनपा/वै.आ./७५/२०२१-२२. दि. ०५/०४/२०२१ रोजीचा आदेश.**
**३)आयुक्त पशुसंवर्धन यांचे एमएडब्लूबी/२०-२१/तां-१/प्र.क्र.२२/६७०/२०२०,पसं-६, पुणे, दि. ०६/०४/२०२१ रोजीचे पत्र.**
**४) महाराष्ट्र शासन आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दि. १३/०४/२०२१**
**५) मिभा/मनपा/वै.आ./२२०/२०२१-२२, दि. १८/०४/२०२१ रोजीचा आदेश.**
**६) महाराष्ट्र शासन आदेश क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१. दि. २१/०४/२०२१.**
**७) मिभा/मनपा/वै.आ./२६६/२०२१-२२. दि. २२/०४/२०२१ रोजीचा आदेश.**

ज्याअर्थी, साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम, १८९७ च्या खंड २,३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणूमुळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी अधिसूचना क्र. कोरोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य५, दि. १४ मार्च २०२० ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे आणि ज्याअर्थी सदर अधिसूचनेच्या नियम ३ अन्वये आयुक्त महानगरपालिका हे सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे, त्याअर्थी, महानगरपालिका कार्यक्षेत्रात COVID-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी म्हणून काम पाहतील.

आणि, ज्याअर्थी, शासन आदेशास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत यापूर्वी संदर्भ क्र. ०१ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आदेशान्वये मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत.

ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव शहरात वाढत असून, महानगरपालिकेचे सर्व DCHC, DCH या ठिकाणी सर्व रूग्ण-बेड व आय.सी.यू. बेड पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. याशिवाय सदर ठिकाणी ऑक्सिजनचा तुटवडा प्रचंड प्रमाणात जाणवत आहे. शासनाकडे याबाबत महानगरपालिका सातत्याने पाठपुरावा करत असून भविष्यामध्ये रूग्णसंख्या याच वेगाने वाढत राहिल्यास ऑक्सिजन, रूग्ण-बेड व आय.सी.यू. बेड उपलब्ध न झाल्याने मोठ्या प्रमाणात जिवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ज्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता कोविडचा संसर्ग रोखण्यासाठी खबरदारीची प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आणखी काही निर्बंध लागू करण्याची आवश्यकता निर्माण झाली असल्याचे आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी, दिलीप ढोले, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, कोरोना विषाणू COVID-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून संपूर्ण मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीक, वाहनांची वर्दळ यावर नियंत्रण आणणेकरीता व कोरोना विषाणूची साखळी तोडण्यासाठी (Break The Chain) प्राप्त अधिकारात खालीलप्रमाणे शास्ती आकारण्यात येईल.



Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-401101.

दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in

मुख्य कार्यालय


जा.क्र. : मिभा/मनपा/ /

दिनांक :

| अ.क्र. | तपशील | शास्ती |
|---|---|---|
| 1) | सार्वजनिक ठिकाणी विना मास्क वापरणे | रूपये 1,000 /- |
| 2) | सार्वजनिक वाहनातून प्रवास करतेवेळी कोव्हिड – 19, निगेटीव्ह आर. टी. पी. सी. आर. – वैध प्रमाणपत्र न बाळगल्यास (15 दिवसां पर्यंतचे वैध प्रमाणपत्र) | रुपये 1,000/- |
| 3) | खाजगी कार्यालय / आस्थापना निर्धारीत दिवशी / वेळेनंतर सुरू ठेवल्यास | रुपये 25,000/- |
| 4) | सार्वजनिक ठिकाणी अनावश्यक निर्धारीत दिवशी / वेळेनंतर वावर करताना आढल्यास (प्रति व्यक्ती) सदर व्यक्तीची RAT test केली जाईल | रूपये 2,000/- |
| 5) | उपाहार गृह/ हॉटेल, निर्धारीत दिवशी / वेळेनंतर सुरू ठेवल्यास (प्रति घटना) | रुपये 25,000/- |
| 6) | लग्न सभारंभासाठी 25 व्यक्ती पेक्षा जास्त / निर्धारीत दिवशी / वेळेनंतर जास्त कालावधीत सुरू राहिल्यास | रूपये 50,000/- |
| 7) | सहकारी गृह निर्माण संस्था यांनी कोव्हिड – 19 मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन केल्यास | रूपये 10,000/- |
| 8) | अत्यावश्यक सेवा करिता वापरण्यात येणारे खाजगी वाहन त्याच्या क्षमतेच्या 50 टक्के पेक्षा जास्त प्रवासी घेवून प्रवास करताना आढळल्यास | रूपये 10,000/- |

उपरोक्त प्रमाणे शास्ती आकारण्यात येईल. तसेच आदेशाचे उल्लंघन करणारी व्यावसायिक आस्थापना आणि दुकानदार मालक, व्यक्ती यांच्यावर उपरोक्त अधिसूचनेमधील महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, 2020 चे नियम 11 नुसार, भारतीय दंडसंहिता (45 of 1860) कलम 188 मधील तरतुदीनुसार दंडनीय / कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(दिलीप ढोले)
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२) मा.पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३) मा.राज्यमंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
४) मा.महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका.
५) मा.मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
६) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
७) मा.पोलिस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर वसई-विरार.
८) मा.जिल्हाधिकारी, जि.ठाणे.
९) मा.उपमहापौर/मा.सभापती,स्थायी समिती/मा.सभागृह नेता/मा.विरोधी पक्षनेता/सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
१०) स्वीय सहाय्यक, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
११) उपायुक्त (सर्व) यांचेकडे माहितीसाठी.
१२) सर्व सहा.आयुक्त/सर्व विभागप्रमुख यांना माहितीसाठी.



Scanned with CamScanner